(इंग्रजीत टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)

**<u>प्रकाशनयोग्य</u>**

**भारताच्या सर्वोच्च न्यायालयात**

**दिवाणी मूळ अधिकारिता**

**<u>लवाद याचिका (दिवाणी) क्र. १/२०१९</u>**

**शिन्हान बँक ... याचिकाकर्ता**

**विरुद्ध**

**कॅरोल इन्फो सर्विसेस लिमिटेड ... उत्तरवादी**

## <u>न्यायनिर्णय</u>

**<u>डॉ. धनंजय य. चंद्रचूड, भारताचे मुख्य न्यायमूर्ती</u>**

१. ५ ऑगस्ट २०११ रोजी, याचिकाकर्त्याने वोक्हार्ट टॉवर्स, सी-२, ब्लॉक जी, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०००५१ येथे पश्चिम विंगच्या चौथ्या

मजल्यावर असलेल्या कार्यालयाच्या जागेचा उत्तरवादीसोबत पाच वर्षांसाठी संमति नि परवानगी करार केला. त्याच दिवशी, संमति नि परवानगी करारासह समकालीन सोयीसुविधा करार करण्यात आला.  संमति नि परवानगी कराराची मुदत संपुष्टात आल्यानंतर, याचिकाकर्ते आणि उत्तरवादी यांच्यात दोन वर्षांच्या कालावधीसाठी जागेचा वापर आणि कब्जा पुढे चालू ठेवण्यासाठी १ जुलै २०१६ रोजी, नवीन संमति नि परवानगी करार करण्यात आला.

२. २५ ऑगस्ट २०१६ रोजी, याचिकाकर्त्याने उत्तरवादीसोबत सुविधा करार केला.

३. २२ मार्च २०१७ रोजी, याचिकाकर्त्याने उत्तरवादीला समाप्तीची नोटीस जारी केली ज्यात म्हटले होते की विहित कालावधी संपल्यानंतर म्हणजेच १ जुलै २०१७ रोजी, संमति नि परवानगी करार आणि सुविधा करार संपुष्टात येतील.

४. उत्तरवादीने ३० मार्च २०१७ रोजी, समाप्तीच्या नोटिशीला उत्तर दिले. ही समाप्ती, संमति नि परवानगी करार आणि सुविधा कराराच्या अटींनुसार नसल्याचा दावा करत उत्तरवादीने याचिकाकर्त्याला सुरक्षा ठेवी परत करण्यास नकार दिला. याचिकाकर्त्याच्या म्हणण्यानुसार, १३ जून २०१७ रोजी परवानाधारक जागेचा रिकामा आणि शांततापूर्ण ताबा उत्तरवादीकडे देण्यात आला.

५. ३ जुलै २०१७ रोजी, याचिकाकर्त्याने सुरक्षा ठेव व्याजासह परत करण्याच्या मागणीची नोटीस बजावली. १३ जुलै २०१७ च्या पत्रात, हा दावा फेटाळण्यात आला होता. १३ जुलै २०१७ च्या दुसऱ्या पत्राद्वारे, उत्तरवादीने याचिकाकर्त्याला १ जुलै २०१७ ते ३० जून २०१८ या कालावधीतील शिल्लक परवाना शुल्क आणि सुविधा शुल्कापोटी रु. २,५९,८५,८५६/- रुपयांच्या रकमेचा दावा करणारी नोटीस बजावली आणि २०१६ च्या करारानुसार सुरक्षा ठेवींची रक्कम समायोजित केल्यानंतर व्याजासह रु. ६९,२१,४०८/- रुपयांचे नुकसान झाल्याचा दावा केला.

६. याचिकाकर्त्याने २९ सप्टेंबर २०१७ रोजी वकिलांच्या पत्राद्वारे रु.१,६८,४८,०००/- (जी संमति नि परवानगी करारानुसार जमा करण्यात आली होती) आणि रु.५६,१६,०००/- (जी सुविधा करारानुसार जमा करण्यात आली होती) रक्कम वार्षिक १५% दराने व्याजासह परत करण्याची मागणी केली. उत्तरवादीने ५ ऑक्टोबर २०१७ च्या उत्तरात हा दावा फेटाळून लावला.

७. ९ ऑक्टोबर २०१७ रोजी याचिकाकर्त्याने लवादाचा वापर केला आणि एकमेव मध्यस्थ नेमण्याचा प्रस्ताव ठेवला. १३ ऑक्टोबर २०१७ च्या उत्तरात उत्तरवादीने लवाद कराराचे अस्तित्व नाकारले.

८. लवाद व समेट कायदा १९९६ च्या कलम ११ अन्वये, मुंबई येथील उच्च

न्यायालयात लवाद याचिका दाखल करण्यात आली होती, परंतु लवाद हा आंतरराष्ट्रीय व्यावसायिक लवाद असल्याने आणि याचिकाकर्ते दक्षिण कोरियाच्या कायद्यानुसार स्थापन झालेली बँकिंग कंपनी असल्याने मागे घेण्यात आली.

९. आम्ही याचिकाकर्त्याचे वकील अभिषेक पुरी आणि उत्तरवादीचे वकील संजीव कुमार कपूर यांचे म्हणणे ऐकले आहे.

१०. दोन्ही पक्षांमध्ये दोन करार झाले. पहिला म्हणजे १ जुलै २०१६ रोजीचा संमति नि परवानगी करार. दुसरा म्हणजे २५ ऑगस्ट २०१६ रोजीचा सुविधा करार. दोन्ही पक्षांमध्ये लवादाचा करार आहे का, हा वादाचा मुद्दा आहे. उत्तरवादीचा युक्तिवाद असा आहे की सुविधा करारामध्ये लवाद करार आहे, परंतु संमति नि परवानगी करारामध्ये नाही. त्यामुळे याचिकाकर्त्याने लवादाचा केलेला दावा फेटाळण्यात यावा, अशी विनंती करण्यात आली आहे. तसेच उत्तरवादीने मुंबई उच्च न्यायालयात मूळशाखे मध्ये खटला दाखल केला असून याचिकाकर्त्याला लवादाचा संदर्भ मागण्यासाठी कलम ८ अन्वये अर्ज दाखल करता येईल, असे नमूद करण्यात आले आहे. उत्तरवादींनी या खटल्यात दावा केलेल्या थकित परवाना शुल्काची, सुरक्षा ठेव समायोजित केल्यानंतर गणना करण्यात आली आहे आणि म्हणूनच याचिकाकर्त्यासाठी, कलम ८ खालील उपायांचा पाठपुरावा करणे ही योग्य कृती

असेल, असे सादर करण्यात आले आहे.

११. २५ ऑगस्ट २०१६ रोजी दोन्ही पक्षांमध्ये झालेल्या सुविधा करारामध्ये इतर गोष्टींसह खालील तरतुदींचा समावेश आहे:

> “हा करार, सदर संमति नि परवानगी कराराच्या अनुषंगाने अंमलात आणला जातो आणि त्यानुसार त्याचे वाचन आणि अर्थ लावला जाईल. अनुज्ञप्तीदात्याने अनुज्ञप्तीधारकाला दिलेल्या परवानाधारक जमिनीच्या परवान्यासंदर्भात या करारातील तरतुदी सदर संमति नि परवानगी कराराचा अविभाज्य भाग समजल्या जातील आणि असतील. सदर संमति नि परवानगी करारातील सर्व तरतुदी, योग्य त्या फेरफारासह असतील; या सुविधा कराराला लागू केल्या जातील."

१२. सुविधा करारामध्ये लवादाद्वारे वाद सोडविण्याची तरतूद आहे. कलम १७ खालील अटींमध्ये आहे:

> “१७. या करारामुळे किंवा त्याच्याशी संबंधित असलेले सर्व विवाद, वाद किंवा दावे : यातील कोणत्याही कलमाचे अस्तित्व किंवा अर्थउकल यासह, दोन्ही पक्षांच्या परस्पर संमतीने लिखित स्वरुपात

> नियुक्त केलेल्या एकमेव लवादाद्वारे लवादाकडे संदर्भित केले जातील आणि असे न झाल्यास, लवाद आणि समेट कायदा, १९६६ मधील तरतुदीनुसार लवादाचा खर्च समान प्रमाणात उचलला जाईल. लवादाचे ठिकाण मुंबई असेल आणि लवाद, वेळोवेळी केलेल्या दुरुस्ती नुसार लवाद आणि समेट कायदा, १९६६ द्वारे नियंत्रित केला जाईल. लवादाच्या कार्यवाहीची भाषा इंग्रजी असेल. निवाडा अंतिम आणि निर्णायक असेल. मुंबईतील न्यायालयांना इथून उद्भवलेल्या प्रकरणांवर न्यायचौकशी करण्याचे आणि विचारार्थ घेण्याचे अनन्य अधिकारक्षेत्र असतील."

१३. उत्तरवादीच्यावतीने विनंती करण्यात आलेली बाजू अशी आहे की, कलम ७ (५) नुसार, एखाद्या दस्तऐवजाचा केवळ संदर्भ दिल्यास त्या दस्तऐवजातील लवादाच्या कलमाला कराराचा भाग बनविण्याचा परिणाम होणार नाही. **एम. आर. इंजिनीअर्स अँड कॉन्ट्रॅक्टर्स प्रायव्हेट लिमिटेड विरुद्ध सोम दत्त बिल्डर्स लिमिटेड**[1] या प्रकरणात, न्यायालयाने दिलेल्या निकालाच्या आधारे हा युक्तिवाद करण्यात आला आहे.

१४. वर काढलेल्या सुविधा कराराच्या कलम (१) मध्ये असे सूचित केले आहे की

---

[1](२००९) ७ एससीसी ६९६

(१) सुविधा करारातील तरतुदी याचिकाकर्त्याने उत्तरवादीला दिलेल्या परवान्यासंदर्भात संमती नि परवानगी कराराचा अविभाज्य भाग मानल्या जातील आणि असतील; आणि (२) संमति नि परवानगी करारातील सर्व तरतुदी सुविधा कराराला लागू होतील. सुविधा कराराच्या कलम १७ मध्ये, वाद लवादाकडे पाठविण्याचा संदर्भ आहे.

१५. सुविधा कराराच्या कलम (१) चा सरळ परिणाम असा आहे की त्या कराराच्या सर्व अटी संमति नि परवानगी कराराचा अविभाज्य भाग आहेत. सुविधा करारामध्ये फक्त संमति नि परवानगी कराराचा संदर्भ नसून तर त्यात संमति नि परवानगी कराराचा अविभाज्य भाग म्हणून सुविधा कराराच्या सर्व अटींचा समावेश आहे. असे केल्याने, पक्षांनी सुविधा करारातील लवाद कलम, हे संमति नि परवानगी कराराचा अविभाज्य भाग बनवण्याचा हेतू ठेवला आहे.

१६. लवाद व समेट कायदा १९९६ च्या कलम ७ (५) नुसार, लवाद कलम अंतर्भूत असलेल्या दस्ताचा करारामधील संदर्भ, जर करार लिखित स्वरूपात असेल आणि सदर संदर्भ, सदर लवाद कलम कराराचा भाग बनविण्यासाठी केला असेल तर सदर लवाद कलम करार बनतो. सुविधा कराराच्या कलम (१) मध्ये सुविधा करारात (कलम १७) अंतर्भूत असलेल्या लवाद कलमाला संमति नि परवानगी कराराचा

अविभाज्य भाग बनविण्याचा हेतू आहे.

१७. **एम. आर. इंजिनीअर्स अँड कॉन्ट्रॅक्टर्स प्रायव्हेट लिमिटेड विरुद्ध सोम दत्त बिल्डर्स लिमिटेड** (उपरोल्लिखित) या प्रकरणामध्ये न्यायालयाने असे मानले की:

> "आम्ही स्थिती स्पष्ट करण्यासाठी अंतर्भावाची काही उदाहरणे आणि केवळ संदर्भ देऊ (उदाहरणात्मक आणि परिपूर्ण नाही). जर एखादा करार एखाद्या दस्तऐवजाचा संदर्भ देत असेल आणि तरतूद करत असेल की हा दस्तऐवज कराराचा एक भाग असेल, किंवा उक्त दस्तऐवजाच्या सर्व अटी व शर्ती किंवा कराराचा एक भाग मानल्या जातील, किंवा कराराचा भाग असतील, उक्त दस्तऐवजाच्या तरतुदींद्वारे करार नियंत्रित केला जाईल, किंवा उक्त दस्तऐवजाच्या अटी व शर्ती करारामध्ये अंतर्भूत केल्या जातील, दस्तऐवजाच्या अटी व शर्ती संपूर्णपणे उचलल्या जातील आणि करारामध्ये समाविष्ट केल्या जातील. जेव्हा दस्तऐवजाच्या अटी आणि शर्तींचा असा समावेश असतो, तेव्हा अशा दस्तऐवजाची प्रत्येक अट (करारातील कोणत्याही विशिष्ट तरतुदीशी विसंगत असलेल्या मर्यादेशिवाय) कराराला लागू होईल. अशा प्रकारे अंतर्भूत केलेल्या दस्तऐवजात लवादाद्वारे

> विवादांचे निराकरण करण्याची तरतूद असल्यास, हे लवाद कलम कराराला देखील लागू होईल."

१८. कलम ७ (५) मधील तरतुदींमधून विशद होणारे तत्त्व निकालाच्या परिच्छेद १९ मध्ये स्पष्ट केले आहे, जे खाली काढले आहे:

> “कलम ७ मधील उप-कलम (५) कराराचा अन्वयार्थ या प्रस्थापित तत्त्वांचा केवळ पुनरुच्चार करते. सदर कलम हे स्पष्ट करते की, जेथे करारामध्ये दस्तऐवजाचा संदर्भ आहे आणि संदर्भ दर्शवितो की दस्तऐवज संपूर्णपणे समाविष्ट करण्याचा हेतू नव्हता, तर, जोपर्यंत ते लागू होण्यासाठी लवादाच्या कलमाचा विशेष संदर्भ नाही तोपर्यंत सदर संदर्भ, दस्तऐवजातील लवाद कलम कराराचा एक भाग बनवणार नाही.”

१९. सुविधा कराराच्या कलम १७ मध्ये अंतर्भूत असलेला लवाद करार सर्व उद्देश आणि हेतूंसाठी पक्षकारांनी संमति नि परवानगी कराराचा भाग होण्याचा हेतू ठेवला होता.

२०. याचिकाकर्त्याला आता कलम ८ अन्वये उपाययोजना करण्यास भाग पाडले जावे, या युक्तिवादात तथ्य नाही. पक्षकारांमधील कराराच्या स्पष्ट अटी लक्षात घेता, लवादाचा संदर्भ आवश्यक असेल.

२१. याचिकाकर्त्याने नामनिर्देशित केलेले एकमेव मध्यस्थ त्यानंतर महाराष्ट्र राज्याचे लोकायुक्त पद स्वीकारले आहे. त्यामुळे याचिकाकर्त्याच्या दाव्यावरून निर्माण होणारे वाद आणि पक्षकारांमधील मतभेद मुंबई उच्च न्यायालयाच्या माजी न्यायमूर्ती डॉ. (सौ.) शालिनी फणसाळकर-जोशी यांच्या एकमेव लवादाकडे सोपवावेत, असे आम्ही निर्देश देतो. लवाद, पक्षकारांशी विचारविनिमय करून शुल्क आणि लवादाची कार्यपद्धती ठरवेल.

२२. प्रबंधक (न्यायिक) या आदेशाची प्रत एकमेव लवादाला पाठवतील.

२३. त्यानुसार लवाद याचिका निकाली काढण्यात आली आहे.

२४. प्रलंबित अर्ज, जर काही असतील, तर ते निकाली काढले जातील.

............. **भारताचे मुख्य न्यायमूर्ती**

**[डॉ. धनंजय य. चंद्रचूड]**

............................**न्यायमूर्ती**

**[पामिदीघंतम श्री नरसिंम्हा]**

...........................**न्यायमूर्ती**

**[जे. बी. पारडीवाला]**

नवी दिल्ली,

१३ मार्च, २०२३.

*************

# <u>अस्वीकरण</u>

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/तिच्या मात्रभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.